पिपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८. लेखा विभाग
क्रमांक:-लेखा/पेन्शन/२३/कावि/१६२/२०२४
दिनांक:- २०/६/२०२४

**विषय:- दि.३० जून २०२४ रोजी म.न.पा सेवेतून सेवानिवृत्त होणा-या अधिकारी/ कर्मचा-यांना १ जुलै ची काल्पनीक वेतनवाढ मंजूर करणे बाबत..**

परिपत्रक

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व विभाग प्रमुखांना कळविणेत येते की, आपल्या विभागातून दि.३० जुन २०२४ रोजी म.न.पा. सेवेतून सेवानिवृत्त होणा-या अधिकारी/कर्मचा-याना दि.२८ जून २०२३ च्या शासन निर्णयानुसार निवृत्तीवेतन/सेवाउपदान मंजूरीसाठी १ जुलैची काल्पनिक वेतनवाढ देय होत आहे, अशा अधिकारी/कर्मचा-यांची १ जुलैची काल्पनिक वेतनवाढ पगारबील संगणक प्रणालीमधून दि. १ जुलै २०२४ रोजीच देय करावी. दि. १ जुलै २०२४ रोजी देय असलेल्या अधिकारी/कर्मचा-याची नावे संगणक प्रणालीत दिसणार नाहीत. त्यासाठी संबंधीत अस्थापना लिपीकानी प्रशासन विभागातील संगणक कक्षाशी त्वरीत संपर्क साधावा. ३० जून रोजी सेवानिवृत्त होणा-या अधिकारी/कर्मचा-याचे निवृत्तीवेतन मंजूरीबाबतचे प्रकरणी १ जुलैची काल्पनिक वेतनवाढ देय आहे किंवा कसे याबाबत दाखला देऊन, देय असलेल्या अधिकारी/कर्मचा-याना संगणक प्रणालीमधून काल्पनिक वेतनवाढ दिले बाबतची मूळप्रत जोडणे बंधनकारक राहील.

दि. १ जुलै ची काल्पनिक वेतनवाढ दि. १ जुलै २०२४ रोजी न दिल्यास तदनंतर संबंधीत अधिकारी/कर्मचा-यांना सदरची काल्पनिक वेतनवाढ संगणक प्रणालीतून देता येणार नाही. त्यामुळे होणा-या परिणामास सर्वस्वी संबधीत विभाग जबाबदार राहील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिक
पिंपरी १८.

प्रत:- सर्व विभाग प्रमुख